फ्लॉवर, कोबी आणि मटारच्या भावात वाढ

पुणे : प्रतिनिधी

मार्केटयार्डात रविवारी फळभाज्यांची आवक गेल्या आठवड्याच्या तुलनेने स्थिर होती. मागणी जास्त असल्याने फ्लॉवर, कोबी, मटारच्या भावात दहा ते वीस टक्क्यांनी वाढ झाली. इतर सर्व प्रकारच्या भाजीपाल्यांचे भाव मागील आठवड्याच्या तुलनेने टिकून होते.

गुलटेकडी मार्केटयार्डमध्ये रविवारी (दि. ३१) राज्याच्या विविध भागांसह परराज्यांतून सुमारे १०० ट्रक फळभाज्यांची आवक झाली. भाजीपाल्याच्या आवकेमध्ये परराज्यांतून झालेल्या आवकेमध्ये कर्नाटक, गुजरात येथून हिरवी मिरची सुमारे १० ते १२ टेम्पो, कर्नाटक, गुजरात येथून कोबी ३ ते ४ टेम्पो, आंध्र प्रदेश, तमिळनाडू येथून ४ टेम्पो शेवगा, राजस्थान येथून १४ ते १५ टेम्पो गाजर, कर्नाटक येथून घेवडा ४ ते ५ टेम्पो, भुईमूग शेंग कर्नाटक येथून २ टेम्पो, मध्य प्रदेश २५ ट्रक मटार, कर्नाटक येथून २ ते ३ टेम्पो पावटा, मध्य प्रदेश येथून लसूण सुमारे ५ टेम्पो आवक झाली होती. तर स्थानिक भागातून झालेल्या आवकेमध्ये सातारी आले सुमारे ६०० ते ७०० गोणी, भेंडी ५ ते ६ टेम्पो, गवार ५ ते ६ टेम्पो, टोमॅटो सुमारे १० ते १२ हजार क्रेट, हिरवी मिरची ४ ते ५ टेम्पो, काकडी ८ ते १० टेम्पो, फ्लॉवर ८ ते १० टेम्पो, कोबी ४ ते ५ टेम्पो, सिमला मिरची ८ ते १० टेम्पो, पावटा ४ ते ५ टेम्पो, तांबडा भोपळा १० ते १२ टेम्पो, कांदा जुना आणि नवीन सुमारे १०० ट्रक, इंदूर, आग्रा, स्थानिक भागातून बटाटा ७० टेम्पो इतकी आवक झाली होती, अशी माहिती मार्केटयार्ड येथील ज्येष्ठ आडतदार विलास भुजबळ यांनी दिली.

फळभाज्यांचे दहा किलोचे भाव - कांदा - नवीन : १६०-२००, बटाटा : १२०-१८०, लसूण : १४००-२२००, आले सातारी : ७००-७५०, भेंडी : ६००-७००, गवार : गावरान ६००-८००, सुरती : ६००-८००, टोमॅटो : १५०-२५०, दोडका : ५००-६००, हिरवी मिरची : ३००-४००, दुधी भोपळा : १००-२००, चवळी : ३००-३५०, काकडी : २००-२५०, कारली : हिरवी ५००-६००, पांढरी : ४००-५००, पापडी : ३५०-४००, पडवळ : २००-३००, फ्लॉवर : २००-२५०, कोबी : १२०-१६०, वांगी : ४००-६००, डिंगरी : २५०-३००, नवलकोल : १००-१२०, ढोबळी मिरची : ५००-५५०, तोंडली : कळी : ५००-६००, जाड : ३००-३२०, शेवगा : ६००-८००, गाजर : २००-२५०, वालवर : ४५०-५००, बीट : १६०-१८०, घेवडा : ३५०-४००, कोहळा : १००-१५०, आर्वी : २००-२५०, घोसावळे : २००-३००, ढेमसे : ३००-३५०, भुईमुग शेंग : ७००-७५०, मटार : २८०-३६०, पावटा : ५००-६००, तांबडा भोपळा : १००-१५०, सुरण : १८०-२००, मका कणीस : ५०-१००, नारळ (शेकडा) : १०००- १६००.

शेपू, चुका, हरभरागड्डी महागली

पुणे : गुलटेकडी येथील रविवारी पालेभाज्यांची आवक कमी झाल्याने शेपू, चुका, हरभरा गड्डीच्या भावात ५ ते १० टक्क्यांनी वाढ झाली होती. इतर सर्व पालेभाज्यांचे भाव स्थिर होते. रविवारी (दि. ३१) कोथिंबिरीची तब्बल दीड लाख जुडी, तर मेथीची ७० हजार जुडी इतकी आवक झाली.

पालेभाज्यांचे शेकड्यातील भाव : कोथिंबीर : ८००-१५००, मेथी : १०००-१६००, शेपू : ८००-१५००, कांदापात : ८००-१५००, चाकवत : ४००-७००, करडई : ३००- ७००, पुदिना : ४००-८००, अंबाडी : ४००-७००, मुळे : ६००-१२००, राजगिरा : ४००-७००, चुका : ६००-१००, चवळई : ३००-७००, पालक : ८००-१५००, हरभरा गड्डी : ८००-१५००.

झेंडूच्या भावात निम्म्याने घट

पुणे : पुण्यातील गुलटेकडी येथील मार्केटयार्डात रविवारी (दि. ३१) गेल्या आठवड्याच्या तुलनेत झेंडूच्या भावात निम्म्याने घट झाली आहे. अन्य फुलांच्याही भावात काहीप्रमाणात घट झाली असून, शेवंतीचे भाव स्थिर असल्याची माहिती व्यापाऱ्यांनी दिली.

फुलांचे प्रतिकिलोचे दर पुढीलप्रमाणे : झेंडू : २०-४०, गुलछडी : १००-१५०, ॲष्टर : जुडी २०-२५, सुट्टा ८०-१२०, कापरी : ३०-६०, शेवंती : ८०-१५०, (गड्डीचे भाव) गुलाबगड्डी : १०-३०, गुलछडी काडी : २०-५०, डच गुलाब (२० नग) : ८०-२००, जर्बेरा : ४०-६०, कार्नेशियन : १००-२००, शेवंती काडी १५०-३००, लिलीयम (१० काड्या) ९००-१०००, ऑर्चिड : ४००-६००, ग्लॅडिओ (१० काड्या) ८०-१२०, जिप्सोफिला : २००-२५०.

कांद्याची आवक वाढून दरात घसरण

नववर्षाच्या स्वागतासाठी बोकड बाजारात मोठी उलाढाल

चाकण : खेड कृषी उत्पन्न बाजार समितीच्या चाकण येथील महात्मा फुले मार्केटयार्ड मध्ये कांद्याच्या आवकेत वाढ होऊन दरात घसरण झाली. पालेभाज्यांची व फळभाज्यांची आवक स्थिर राहिली. जनावरांच्या बाजारात जर्शी गाई, म्हैस व बैल यांच्या संख्येत वाढ झाली. तर नववर्षाच्या स्वागताच्या पार्श्वभूमीवर मांसाहारासाठी चाकण मधील शेळ्या - मेंढ्यांच्या व बोकड बाजारात मोठी उलाढाल झाली. राज्यासह परराज्यातील व्यापाऱ्यांनी चाकण मार्केट मध्ये हजेरी लावली. नववर्षाच्या पार्श्वभूमीवर चाकण मार्केटची उलाढाल तब्बल २ कोटी रुपयांनी वाढली. एकूण उलाढाल ५ कोटी १० लाख रुपये झाली.

चाकण येथील बाजारात कांद्याची एकूण आवक ५ हजार क्विंटल झाली. गेल्या आठवड्याच्या तुलनेत ही आवक २५० क्विंटलने वाढून भावात ३०० रुपयांची घट झाली. कांद्याचा कमाल भाव २५०० रुपयांवरुन २२०० रुपयांवर स्थिरावला. बटाट्याची एकूण आवक १,५०० क्विंटल झाली. गेल्या आठवड्याच्या तुलनेत ही आवक स्थिर राहून बटाट्याच्या भावात १०० रुपयांची वाढ झाली. जळगाव भुईमूग शेंगा व बंदूक भुईमूग शेंगांची काहीच आवक झाली नाही. लसणाची एकूण आवक ३० क्विंटल झाली. गेल्या आठवड्याच्या तुलनेत ही आवक स्थिर राहून लसणाला १५ ते २० हजार एवढा क्विंटलला भाव मिळाला. हिरव्या मिरचीची एकूण आवक ३७५ क्विंटल झाली. गेल्या आठवड्याच्या तुलनेत ही आवक १५ क्विंटलने वाढली. हिरव्या मिरचीला ३ हजार रुपयांपासून ते ४ हजार रुपयांपर्यंत भाव मिळाला.

शेतीमालाची आवक व बाजारभाव पुढील प्रमाणे :

कांदा - एकूण आवक - ५००० क्विंटल. भाव क्रमांक १. २,२०० रुपये, भाव क्रमांक २. १,८०० रुपये, भाव क्रमांक ३. १,५०० रुपये.

बटाटा - एकूण आवक - १,५०० क्विंटल. भाव क्रमांक १. १,५०० रुपये, भाव क्रमांक २. १,३०० रुपये, भाव क्रमांक ३. १,१०० रुपये.

फळभाज्यांच्या बाजारात एकूण आवक क्विंटलमध्ये व प्रतिदहा किलोंसाठी मालाला मिळालेले भाव कंसात पुढील प्रमाणे : टोमॅटो - २२० क्विंटल (१,५०० ते ३,००० रू.), कोबी - २१० क्विंटल (८०० ते १,२०० रू.), फ्लॉवर - २०० क्विंटल (१,५०० ते २,५०० रु.), वांगी - ६२ क्विंटल (६,००० ते ८,००० रु.), भेंडी - ५३ क्विंटल (५,००० ते ७,००० रु.), दोडका - ४२ क्विंटल (५,००० ते ६,००० रु.), कारली - ५२ क्विंटल (४,००० ते ५,००० रु.), दुधीभोपळा - ६० क्विंटल (२,००० ते ३,५०० रु.), काकडी - ७२ क्विंटल (१,००० ते २,००० रु.), फरशी - ४८ क्विंटल (४,००० ते ५,००० रु.), वालवड - ५२ क्विंटल (५,००० ते ७,००० रुपये), गवार - ४६ क्विंटल (८,००० ते १०,००० रुपये,), ढोबळी मिरची - १३६ क्विंटल (५,००० ते ७,००० रु.), चवळी - २४ क्विंटल (४००० ते ५००० रु.), वाटाणा - ५२५ क्विंटल (२,८०० ते ३,२०० रु.), शेवगा - १८ क्विंटल (८,००० ते १०,०० रु.), गाजर - २७० क्विंटल (२,००० ते २,५०० रु.),.

चाकण येथील बाजारात पालेभाज्यांची एकूण आवक जुड्यांमध्ये व भाज्यांना मिळालेले भाव पुढीलप्रमाणे:

मेथी - एकूण ८ हजार ९५० जुड्या (१,८०० ते २,२०० रुपये,), कोथिंबीर - एकूण ३२ हजार ६०० जुड्या (५०० ते १,००० रुपये,), शेपू - एकूण ३ हजार ४०० जुड्या (८०० ते १,२०० रुपये), पालक - एकूण ३ हजार ८५० जुड्या (८०० ते १,२०० रुपये),.

खरबूज, सीताफळाच्या भावात वाढ, तर लिंबाच्या भावात घट

पुणे : पुण्यातील गुलटेकडी मार्केटयार्डातील फळबाजारात रविवारी (दि. ३१) खरबूज आणि सीताफळाच्या भावात वाढ झाली असून, लिंबाच्या भावात घसरण झाली आहे. तर अननस, डाळिंब, संत्रा, मोसंबी, कलिंगड, स्ट्रॉबेरी, पपई, चिक्कू, पेरू आणि बोरांचे भाव स्थिर असल्याची माहिती व्यापाऱ्यांनी दिली.

येथील मार्केटयार्डमध्ये रविवारी केरळ येथून अननस ५ ट्रक, मोसंबी ५० ते ५५ टन, संत्रा ५० ते ५५ टन, डाळिंब २५ ते ३० टन, पपई १५ ते २० टेम्पो, लिंबांची सुमारे ३ ते साडेचार हजार गोणी, कलिंगड ४ ते ५ टेम्पो, खरबूज ९ ते १० टेम्पो, सीताफळ २५ ते ३० टन, चिक्कू २ हजार बॉक्स आणि बोरांची १७०० गोणी इतकी आवक झाल्याची माहिती व्यापाऱ्यांनी दिली.

फळांचे भाव पुढीलप्रमाणे- लिंबे (प्रतिगोणी) : १००-३००, अननस (१ डझन): १००- ६०० मोसंबी : (३ डझन) : १७०-३२०, (४ डझन) : १००-१७०, संत्रा : (१० किलो) : २५०-६००, डाळिंब (प्रतिकिलोस) : भगवा : ४०-१३०, गणेश : १०-३०, आरक्ता १०-५०, कलिंगड : १०-१६, खरबूज : १२- २५, पपई : ५-१५, चिक्कू (दहा किलो) : १००-५००. सीताफळ (एक किलो) : २०-६०, पेरू (वीस किलो) ३००-५००, बोरे (दहा किलो) चमेली : १८०-२२०, उमराण : ७०-१००, चेकटन : ६५०-७००, चण्यामण्या : १०००-१२००.

हडपसरमधील अंगणवाडी शिक्षक आंदोलनास काँग्रेसचा पाठिंबा

हडपसर : प्रतिनिधी

अंगणवाडी शिक्षक सेविकांनी पुकारलेल्या संपास काँग्रेस पक्षाच्या अनुसूचित जाती जमाती सेलचे प्रदेश सचिव ज्ञानेश्वर कांबळे यांनी पाठिंबा जाहीर केला आहे.

या वेळी बाळासाहेब पवार, काँग्रेस पक्षाचे कार्यकर्ते, प्रतिष्ठित नागरिक व आंदोलनकर्त्या अंगणवाडी शिक्षिका हेमलता हिंगणे, सुजाता शेडगे, प्रीती रासकर, कांचन चौघुले, सारिका सोनवळ, पुष्पा मेमाणे, अनिता फुले, मंजूषा कुलकर्णी, सेविका-मदतनीस उषा म्हेत्रे, संगीता वेटम, वनीता खोपडे, सुनीता इभाड, शिल्पा रासकर, रूपाली म्हस्के, पूजा मिटकरी, प्रियंका रणवरे आदी उपस्थित होत्या.

जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविणेत येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेल्या जमीन मिळकतीचे **विद्यमान मालक नंदु राणुजी बुटे, रा. वराळे, पो. आंबेठाण, ता. खेड, जि. पुणे** यांचे मालकी ताबे वहिवाटीची आहे. त्यांनी खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत आमचे अशील यांना विक्री करण्याचे ठरवून तसा खरेदीखताचा व्यवहार ठरविलेला आहे. सदर मिळकती निर्वेध, निजोखमी, बोजारहीत असल्याचा भरवसा व खात्री त्यांनी आमचे अशिलांना दिलेला आहे. तरी सदर मिळकतीमध्ये कोणाचाही, कसल्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास सदरची नोटीस प्रसिध्द झालेपासून **०५ दिवसांचे आत** पुराव्याचे कागदपत्रासह आमची खात्री पटवून दयावी. सदर मुदतीत कोणाचीही तक्रार न आल्यास सदर मिळकती निर्वेध व निजोखमी आहेत, असे समजून ज्या कोणाचा काही हक्क, हितसंबंध असल्यास तो त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिलेला आहे. असे समजून आमचे अशील ठरलेला व्यवहार पूर्ण करतील. नंतर कोणाचीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

परिशिष्ट मिळकत : गाव मौजे सातकरस्थळ, ता. खेड, जि. पुणे येथील जमीन गट नंबर ३८ /६ यांसी संपूर्ण क्षेत्र ०१ हे. ३८ आर (पो.ख. सह) यांसी आकार ०२ रु. ३६ पैसे, यापैकी नंदु राणुजी बुटे यांचे सामाईक मालकी वहीवाटीचे क्षेत्र ०० हे. १३ आर यापैकी त्यांच्या संपूर्ण अविभाज्य मालकी हिश्श्याचे क्षेत्र ०० हे. २.९२ आर म्हणजेच ३१५० चौ. फूट यांसी आकार ०० रु. १० पैसे येणेप्रमाणे मिळकत त्यातील सर्व हक्क व अधिकारासह जमीन मिळकत, हा या जाहीर नोटीसचा विषय असे.

सही/–

दिनांक : ३१/१२/२०२३ **आमचे अशिलांतर्फे**

अ‍ॅड. शुभम बाळासाहेब गाडगे
शंतनु हॉटेलच्यावरती, ऑफिस नं. १०६ जिल्हा कोर्टाच्या पाठीमागे,
राजगुरूनगर, ता. खेड, जि. पुणे, मो. नं. ८४८३८१५२८३

जाहीर नोटीस

या नोटिशीद्वारे कळविणेत येते की, **अपिलार्थी - १) रामदास चिंधु मराठे व इतर सर्व** रा. - वराळे गावठाण, ता. मावळ, जि. पुणे यांनी मौजे तळेगाव दाभाडे, ता. मावळ, जि. पुणे येथील गट नं./ स. नं. ६४ व ६५ या मिळकतीबाबत मंजूर झालेला फेरफार क्र. २३२६१ या नोंदीविरुद्ध अपिल दाखल केले आहे.

प्रस्तुत अपिलातील **जाब देणार- ३क) श्री. नारायण गोपीनाथ खोल्लम,** रा. खोल्लम वाडा, शाळा चौक, तळेगाव दाभाडे, ता. मावळ, जि. पुणे यांना नोटिसा काढूनही वारंवार गैरहजर राहिलेने त्यांना प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकामी हजर राहणेकरिता वर्तमानपत्रातून जाहीर नोटीस देणेची विनंती अपिलार्थी यांनी केलेली आहे.

तरी या नोटिशीद्वारे सर्व संबंधितांना कळविणेत येते की, उपरोक्त जमिनीसंदर्भातील प्रस्तुत दाव्याचे चौकशीकामी दिनांक ०८/०१/२०२४ ही पुढील सुनावणी तारीख नेमणेत आलेली आहे. प्रस्तुत अपिलाचे चौकशीकामी सदर दिवशी सकाळी ११.०० वा. या कार्यालयात चौकशीकरिता पुराव्याचे कागदपत्रांसह स्वतः जातीने अगर आपले कायदेशीर प्रतिनिधींमार्फत सदर नोटीस मिळालेपासून १० दिवसांत न चुकता हजर राहावे. जर नेमलेल्या तारखेस वेळी व ठिकाणी आपण वा आपले प्रतिनिधी दाव्याचे चौकशीसमयी गैरहजर राहिलेस प्रस्तुत अपिलाकामी आपले काहीही म्हणणे नाही, असे गृहित धरून अपिलाचे चौकशीकामी नियमानुसार पुढील निर्णय घेण्यात येईल व मागाहून तक्रार अगर म्हणणे ऐकून घेतले जाणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

परिशिष्ट

अ. क्र.	गावाचे नाव	ग.नं/स.नं.
१	मौजे तळेगाव दाभाडे, ता. मावळ, जि. पुणे	६४ व ६५

सदर नोटीस माझे सही व शिक्क्यानिशी आज दिनांक १९/१२/२०२३ रोजी पुणे विभागीय महसूल प्रशिक्षण प्रबोधिनी, बावधन बु., ता. मुळशी, जि. पुणे ४११०२१ येथून जारी केली आहे.

सही/–
(सुरेंद्र नवले)
उपविभागीय अधिकारी
मावळ-मुळशी,उपविभाग पुणे

क्र. आरटीएस/अपिल/एसआर/४६१/२०२३
पुणे विभागीय महसूल प्रशिक्षण प्रबोधिनी,
बावधन बु., ता. मुळशी, जि. पुणे- ४११०२१

मे. एस. एच. अटकारे सो. ३ रे प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी क. स्तर, बारामती यांचे न्यायालयात

फौजदार किरकोळ अर्ज क्र. २६४/२०२१
नि. क्र. : ५

जाहीर नोटीस

१. उमा संजय बागव, वय ३५, रा. साठेनगर, कसबा, ता. बारामती, जि. पुणे ... अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही ...जाबदार

जन्ममृत्यू कायदा १९६९ व जन्ममृत्यू नियम १९७३ मधील कलम १३ (३) व नियम १० प्रमाणे अर्ज

याद्वारे जाहीर नोटीस काढण्यात येते की, वरील अर्जदार यांना त्यांचे सासरे नामे कै. श्रीरंग विठोबा बागव यांचा जन्म दिनांक ०९/०३/१९७९ रोजी मौजे साठेनगर, कसबा ता. बारामती, जिल्हा पुणे येथे झालेला आहे. अर्जदार व त्यांच्या कुटुंबियांकडून **मृत्यूची नोंद** मौजे बारामती नगरपरिषद दप्तरी/ रेकॉर्डवर करावयाची राहून गेली असून तशी ग्रामपंचायत दप्तरी रेकॉर्डला नोंद व्हावी, असा **किरकोळ अर्ज ३ रे प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, क. स्तर बारामती** येथे दाखल केला आहे व त्यावर मे. न्यायालयाने सदरची नोटीस दैनिक वृत्तपत्रात जाहीर करणेचा आदेश पारित केला आहे. सदर घटनेबाबत कोणास आक्षेप अगर म्हणणे मांडावयाचे असल्यास त्यांनी नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत मे. न्यायालयात स्वतः किंवा वकिलांमार्फत हजर राहून आपले म्हणणे दाखल करावे.

आज दिनांक ०१/१२/२०२३ रोजी जाहीर नोटीस माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले असे.

हुकूमान्वये,
सही/–
शिक्का
सहा. अधीक्षक
फौजदारी न्यायालय, बारामती

जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात नमूद मिळकत तिचे विद्यमान मालक **१. सौ. प्रियांका राजु बेलकर २. सौ. राजश्री बाळासाहेब बेलकर,** रा. पुणे यांच्या मालकी व प्रत्यक्ष कब्जेवहिवाटीमध्ये आहे. सदर मिळकत ही निर्वेध व निजोखमी आहे. विद्यमान मालकांना सदर मिळकतीची विक्री विल्हेवाट करण्याचा पूर्ण हक्क व अधिकार असून, सदर मिळकतीमध्ये त्यांचेशिवाय इतर कोणाचेही, कसलेही हक्क, अधिकार वा हितसंबंध नाहीत, अशी खात्री व भरवसा विद्यमान मालकांनी आमचे अशिलांना दिला आहे. त्यानुसार आमचे अशील आणि वर नमूद विद्यमान मालकांच्या दरम्यान सदर मिळकतीच्या खरेदी–विक्रीबाबत बोलणी होऊन सदर विद्यमान मालकांनी विसारादाखल रक्कम देखील स्वीकारलेली आहे. तरी सदर मिळकतीमध्ये कोणाचाही,कसल्याही प्रकारे मालकी हक्क, बोजा, कर्ज, दावा, लिज, लिन, करार, इच्छापत्र, विसारपावती, साठेखत, गहाणखत, करार–मदार, खरेदीखत, बक्षीस, पोटगी, चोळीबांगडी अथवा अन्य प्रकारचे कुठलेही हक्क, अधिकार वा हितसंबंध असल्यास त्याबाबत त्यांनी प्रस्तुत नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ०७ (सात) दिवसांचे आत आम्हांस खालील पत्त्यावर मूळ कागदपत्रांनिशी लेखी हरकत घेवून आमची खात्री पटवून द्यावी. अन्यथा सदर मिळकत ही निर्वेध, निजोखमी असून, त्यामध्ये इतर कोणाचाही, काहीही हक्क, अधिकार वा हितसंबंध नाही व असल्यास तो त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिला आहे व ते कायमस्वरूपी संपुष्टात आल्याचे समजून, आमचे अशील सदर मिळकतीबाबतचा खरेदी–विक्री व्यवहार पूर्ण करतील. नंतर त्याअनुषंगाने कोणाचीही, कसल्याही प्रकारची तक्रार वा हरकत चालणार नाही, याची नोंद घ्यावी.

(परिशिष्ट) :– तुकडी पुणे, पोट तुकडी तालुका हवेली, मे. दुय्यम निबंधक सो., हवेली पुणे यांचे कार्यक्षेत्रातील, तसेच जिल्हा परिषद पुणे आणि तालुका पंचायत समिती हवेली यांचे हद्दीमधील गाव मौजे वडदरे येथील मिळकत गट नंबर / भूमापन क्र. ५१२ यांसी क्षेत्र ० हेक्टर ७०.८ आर + पोट खराबा ० हेक्टर ०१ आर असे एकूण क्षेत्र ०० हेक्टर ७१.८० आर यांसी आकार ०९ रु. ८७ पैसे ही संपूर्ण शेतजमीन मिळकत, यांसी चतु:सीमा : **पूर्वेस :** गट नं. ५०८, गट नं. ५०९, **दक्षिणेस :** गट नं. ५११, गट नं. ५०९, **पश्चिमेस :** गट नं. ५१३, गट नं. ५१४, **उत्तरेस :** गट नं. ५१४, गट नं. ५०८ ही मिळकत प्रस्तुत जाहीर नोटीसीचा मुख्य विषय आहे. येणेप्रमाणे जाहीर नोटीस दिली असे.

सही/–

पुणे, दिनांक : / / २०२३

अ‍ॅड. आरती एस. चौबे (पंडीत)
ऑफिस : साई पॅलेस, तळमजला, पोस्ट ऑफिस जवळ, लोणी काळभोर, ता. हवेली, जि. पुणे– ४१२२०१.
मोबाः – ८४८५०३१२६६ ई मेलः aartipandit20@gmail.com

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे – ४११०१८

कर आकारणी व कर संकलन विभाग

जाहीर प्रकटन

ऑनलाईन पध्दतीने आकारणी पुस्तकातील नोंदी व मालमत्ता उतारा

कर आकारणी व करसंकलन विभागामार्फत शहरातील इमारत व जमिनीवर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार मालमत्ता कराची आकारणी व वसुलीची कार्यवाही करणेत येते. यासाठी करसंकलन विभागीय कार्यालये कार्यरत असून, या कार्यालयांचे हद्दीत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील अनुसूची ड प्रकरण ८ नियम ९ नुसार सध्या हस्तलिखित पद्धतीने सध्या गटनिहाय मालमत्तेच्या आकारणी पुस्तकामध्ये (Assessment Register) नोंदी घेण्यात येतात व नागरिकांना हस्तलिखित मालमत्ता उतारा देणेची कार्यवाही करणेत येत आहे.

शहराचे वाढते नागरीकरण व वाढती मालमत्ता संख्या विचारात घेता, नागरिकांना सुलभ व जलद सेवा प्रदान करणेचे दृष्टीने मालमत्तानिहाय ऑनलाईन आकारणी पुस्तकात दिनांक ०१ जानेवारी २०२४ पासून मालमत्ता नोंदी व फेरफाराच्या नोंदी घेणेची कार्यवाही करणेबाबत मा. प्रशासक यांचेकडील मा. स्थायी समिती सभा मंजूर ठराव क्रमांक २७११, दिनांक २६/१२/२०२३ नुसार मान्यता देणेत आली आहे, त्यानुसार खालील कार्यपध्दती अमलात राहील.

१. सध्या गटनिहाय हस्तलिखीत पद्धतीने मालमत्तेची नोंद आकारणी पुस्तकात (Assessment Register) घेणेत येते. या पद्धतीत दिनांक ०१ जानेवारी २०२४ पासून बदल करणेत येऊन मालमत्तानिहाय ऑनलाईन पद्धतीने नवीन मालमत्तेची नोंद घेणेची कार्यवाही करणेत येणार आहे.

२. नवीन मालमत्तेचे करयोग्य मूल्य निश्चित झालेनंतर मालमत्तेसंबंधी ऑनलाईन आकारणी पुस्तकात मालमत्तेचे मालक / भोगवटादार नाव, मालमत्तेचा स्थानिक अचूक पत्ता, वर्णन, बांधकाम दर्जा, क्षेत्रफळ, मालमत्ता आकारणी तपशील, ज्या आदेशान्वये करयोग्य मूल्य निश्चित करणेत आले त्याचा तपशील, मालमत्तेचे स्वरुप, फेरफार नोंदी, दुरुस्ती इत्यादी संबंधी नोंदी नमूद असतील. नागरिकांना असा मालमत्ता नोंदीचा उतारा महानगरपालिकेच्या **www.pcmcindia.gov.in** या संकेतस्थळावरून उपलब्ध होणार आहे.

३. मालमत्तांनिहाय आकारणी पुस्तकांत दिनांक ०१ जानेवारी २०२४ नंतर नोंद घेतलेल्या मालमत्तांप्रकरणी मालमत्तेमध्ये त्यानंतर वाढ / घट / दुरुस्ती / हस्तांतरण / फेरफार इत्यादी बाबी घडल्यास अशा आदेशांच्या नोंदी घेण्यात येणार आहेत.

४. दिनांक ०१ जानेवारी २०२४ पासून नवीन मालमत्तेचे ऑनलाईन आकारणी पुस्तक (Assessment Register) कार्यान्वित होणार आहे. त्याबरोबर दिनांक ३१ डिसेंबर २०२३ पर्यंत सध्याचे हस्तलिखीत आकारणी पुस्तकात (Assessment Register) नोंद असलेल्या मालमत्तांचे देखील मालमत्तानिहाय ऑनलाईन संगणक प्रणालीत नोंदी घेण्याची कार्यवाही करणेत येणार आहे. त्यामुळे अशा दिनांक ३१ डिसेंबर २०२३ पूर्वी नोंद असलेल्या मालमत्तेचा उतारा देखील नागरिकांना ऑनलाईन उपलब्ध होईल.

सदर सुविधा मनपाचे संकेतस्थळावरील मुख्य पृष्ठावर नागरिक या लिंकमध्ये मिळकतकर या लिंकवर ऑनलाईन उतारा येथे उपलब्ध करून देण्यात आली आहे. नागरिकांनी स्वतःचा मोबाईल क्रमांक व ई–मेल आयडी नमूद करावा. नोंदविलेल्या मोबाईल क्रमांकावरील आलेला ओटीपी नोंदविल्यानंतर ज्या मालमत्ताधारकांनी संपूर्ण मालमत्ता कराचा भरणा केलेला आहे. अशा मालमत्ताधारकांना मालमत्ता क्रमांक नमूद केलेनंतर ऑनलाईन मालमत्ता उतारा फी रक्कम रूपये २०/– भरणा करून दाखला प्राप्त होणार आहे. विभागीय कार्यालयामार्फत देण्यात येणारा मालमत्ता नोंदीचा उतारा सुविधा यापुढे फक्त ऑनलाईन पध्दतीने सुरू राहील. तथापि, अपवादात्मक/ न्यायालयीन/ शासकीय कामकाज याकरिता प्रशासन अधिकारी यांचे मान्यतेने देणेत येईल, याची नोंद घ्यावी.

सही/–
(शेखर सिंह)
आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

जाहिरात क्र. ४८३
जावक क्रमांक : कर/मुख्य/ ०९/ कावि/८०९/२०२३.
दि. २९/१२/२०२३.

ICICI Home Finance | **कॉर्पोरेट कार्यालय :** आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड, आयसीआयसीआय एचएफसी टॉवर, अंधेरी – कुर्ला रोड, अंधेरी (पूर्व), मुंबई ४०० ०५९, भारत

शाखा कार्यालय : ऑफिस क्र. १०१, १ ला मजला, फोर्च्यून बिझनेस सेंटर, ॲम्बियन्स हॉटेलजवळ, कसपटे वस्ती, वाकड पुणे – ४११०५७

नियम ८ (६) च्या तरतुदी पाहा
अचल मालमत्तांच्या विक्रीसाठी सूचना

सीक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्सिअल ॲसेट्स आणि इन्फोर्समेंट ऑफ सीक्युरिटी इंटरेस्ट कायदा २००२ तसेच त्यासह वाचा सीक्युरिटी इंटरेस्ट (इन्फोर्समेंट) नियम २००२ च्या नियम ८ (६) अंतर्गत तरतुदींच्या अनुसार अचल मालमत्तांच्या ई– लिलाव विक्रीकरिता सूचना.
याद्वारे आम जनतेला आणि विशेषतः कर्जदार आणि हमीदार यांना सूचित करण्यात येते की, खालीलप्रमाणे नमूद केलेल्या मालमत्ता या संरक्षित धनको यांच्याकडे तारण ठेवण्यात आल्या आहेत. तसेच त्यांच्यावर धनको यांचा भार आहे आणि त्यांचा **प्रतीकात्मक ताबा** आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड यांच्या प्राधिकृत अधिकारी यांनी घेतला आहे आणि त्यांची विक्री " जसे आहे जिथे आहे " , " जसे आहे जे आहे " तत्त्वानुसार आणि खालीलप्रमाणे देण्यात आलेल्या तपशिलाच्या अनुसार करण्यात येणार आहे.

अ. क्र.	कर्जदार / सह कर्जदार / हमीदार / कायदेशीर वारसदार यांचे नाव आणि कर्जखाते क्रमांक	संरक्षित मालमत्तेचा तपशील त्यावर असलेल्या भारांसह असल्यास	येणे असलेली रक्कम	राखीव किंमत इसारा रक्कम ठेव	मालमत्तेच्या पाहणीची तारीख आणि वेळ	लिलावाची तारीख आणि वेळ
ए	बी	सी	डी	इ	एफ	जी
१	रवींद्र सीताराम अडावदे (कर्जदार), पुष्पा रवींद्र अडावदे (सहकर्जदार) कर्ज खाते क्र. एलएचपीयूएन ००००१२८१५८१	फ्लॅट क्र. १७, स्टील्ट २ रा मजला, भिकोबा हाईट्स, धायरी फाटा, नाऱ्हे रोड, वडगाव बुद्रुक, सर्व्हे क्र. ६५, पुणे – ४११०४१	रु. २४,८९,४०३/– दि. १५ डिसेंबर, २०२३	रु. २३,९९,५१३/– रु. २,३९,९६०/–	०८ जानेवारी, २०२४ रोजी स. ११.०० ते दु. ३.००	१९ जानेवारी, २०२४ रोजी दु. २.०० ते दु. ३.००
२	ओंकार बालासाहेब कामटे (कर्जदार), बालासाहेब भीमू कामटे(सहकर्जदार) कर्ज खाते क्र. एलएचपीयूएन ००००१२७३८७९	फ्लॅट क्र. २१ आणि २२, मुंबई बाजार, २ रा मजला, श्री पल्लवी अपार्टमेंट को–ऑप. हाऊ. सो. शिरूर, सर्व्हे क्र. १६९६, पुणे – ४१२२१०	रु. २७,५२,८९१/– दि. १५ डिसेंबर, २०२३	रु. २५,७१,१३१/– रु. २,५७,१२०/–	०८ जानेवारी, २०२४ रोजी स. ११.०० ते दु. ३.००	१९ जानेवारी, २०२४ रोजी दु. २.०० ते दु. ३.००
३	ओंकार बालासाहेब कामटे (कर्जदार), बालासाहेब भीमू कामटे(सहकर्जदार) कर्ज खाते क्र. एलएचपीयूएन ००००१२७४१८३	दुकान क्र. १९ आणि २०, उत्पन्न बाजार समिती कम. इमा. हुडको रोड, नवीन मार्केट यार्ड, शिरूर स. क्र. ११३५ ए, पुणे – ४१२२१०	रु. ३३,९२,०६०/– दि. १५ डिसेंबर, २०२३	रु. ३६,८५,५००/– रु. ३,६८,५५०/–	०८ जानेवारी, २०२४ रोजी स. ११.०० ते दु. ३.००	१९ जानेवारी, २०२४ रोजी दु. २.०० ते दु. ३.००

ऑनलाइन लिलाव प्रक्रिया ही आमची लिलाव एजन्सी **ग्लोबल टेक** यांचे संकेतस्थळ (**यूआरएल लिंक** – https://BestAuctionDeal.com) यांच्या माध्यमातून घेण्यात येईल. तारणदार / सूचना देण्यात येत आहे की, त्यांनी एकूण येणे असलेली रक्कम अधिक त्यावरील व्याज आणि अन्य शुल्क दिनांक **१८ जानेवारी, २०२४** रोजी **संध्याकाळी ०५. ००** पर्यंत अदा करावे. त्यास्तव ही शेवटची संधी आहे, अन्यथा संरक्षित मालमत्तांची विक्री वरीलप्रमाणे नमूद केलेल्या वेळापत्रकानुसार करण्यात येणार आहे.
प्रस्तावित बोलीदार यांनी ईएमडी रक्कम आरटीजीएस / डीडी यांच्या माध्यमातून (रकाना ई चा संदर्भ घ्यावा) **आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड, ऑफिस क्र. १०१, १ ला मजला, फोर्च्यून बिझनेस सेंटर, ॲम्बियन्स हॉटेलजवळ, कसपटे वस्ती, वाकड पुणे – ४११०५७** येथे **१८ जानेवारी, २०२४** रोजी **संध्याकाळी ४.००** वाजेपर्यंत किंवा त्यापूर्वी अदा करावी. कृपया नोंद घ्यावी की, प्रस्तावित बोलीदार वरीलप्रमाणे नमूद केलेल्या वेळापत्रकानुसार आणि वेळेत आपली बोली सादर करू शकणार नसतील तर निविदा प्रपत्र **आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड, ऑफिस क्र. १०१, १ ला मजला, फोर्च्यून बिझनेस सेंटर, ॲम्बियन्स हॉटेलजवळ, कसपटे वस्ती, वाकड पुणे – ४११०५७** येथे **१८ जानेवारी, २०२४** रोजी **संध्याकाळी ५.००** वाजेपर्यंत किंवा त्यापूर्वी सादर करता येईल. ईएमडी रकमेच्या संदर्भात डीडी हा राष्ट्रीयीकृत / शेड्युल बँकेचा आणि " **आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड– लिलाव** " यांच्या नावे आणि **पुणे** येथे देय असावा.
वरीलप्रमाणे नमूद केलेल्या संरक्षित मालमत्तांच्या संदर्भात पाहणी करण्यासाठी यापुढील अधिक स्पष्टीकरणासाठी, तसेच लिलावाच्या संदर्भात अटी आणि शर्ती यांची माहिती जाणून घेण्यासाठी आणि निविदा सादर करण्याच्या संदर्भातील अधिक माहिती जाणून घेण्यासाठी कृपया **आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड – ९९२०८०७३००** किंवा आमचे विक्री आणि विपणन भागीदार **नेक्सेन सोल्युशन्स प्रायव्हेट लिमिटेड** यांच्याशी संपर्क साधावा.
कोणतीही किंवा सर्व बोली कोणतेही कारण न देता फेटाळून लावण्याचा अधिकार प्राधिकृत अधिकारी यांनी राखून ठेवला आहे. विक्रीच्या संदर्भातील सविस्तर अटी आणि शर्ती जाणून घेण्यासाठी कृपया https://www.icicihfc.com/ येथे भेट द्यावी.

दिनांक : १ जानेवारी, २०२४
स्थळ : पुणे

प्राधिकृत अधिकारी
आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड

ICICI Home Finance | **कॉर्पोरेट कार्यालय :** आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड, आयसीआयसीआय एचएफसी टॉवर, अंधेरी – कुर्ला रोड, अंधेरी (पूर्व), मुंबई ४०० ०५९, भारत

शाखा कार्यालय : कार्यालय क्र. १०१, १ ला मजला, फोर्च्यून बिझनेस सेंटर, ॲम्बियन्स हॉटेलजवळ, कस्पटे वस्ती, वाकड, पुणे – ४११ ०५७.
शाखा कार्यालय : ११८७/२२, वेंकटेश मेहेर, घोले रोड, शिवाजी नगर, पुणे – ४११ ००५.
शाखा कार्यालय : २ रा मजला, कार्यालय क्र. २०३, साई मीडास, पतियाला हाऊसच्या समोर, नगर, मनमाड रोड, सावेडी, अहमदनगर – ४१४ ००३.
शाखा कार्यालय : २ रा मजला, सोनवणे कॉम्प्लेक्स, कामदार पेट्रोल पंपाच्या शेजारी, मिनी मार्केट, मेन रोड, लातूर – ४१३५१२.

नियम ८ (६) च्या तरतुदी पाहा
अचल मालमत्तांच्या विक्रीसाठी सूचना

सीक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्सिअल ॲसेट्स आणि इन्फोर्समेंट ऑफ सीक्युरिटी इंटरेस्ट कायदा २००२ तसेच त्यासह वाचा सीक्युरिटी इंटरेस्ट (इन्फोर्समेंट) नियम २००२ च्या नियम ८ (६) अंतर्गत तरतुदींच्या अनुसार अचल मालमत्तांच्या ई–लिलाव विक्रीकरिता सूचना.
याद्वारे आम जनतेला आणि विशेषतः कर्जदार आणि हमीदार यांना सूचित करण्यात येते की, खालीलप्रमाणे नमूद केलेल्या मालमत्ता या संरक्षित धनको यांच्याकडे तारण ठेवण्यात आल्या आहेत. तसेच त्यांच्यावर धनको यांचा भार आहे आणि त्यांचा **प्रत्यक्ष ताबा** आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड यांच्या प्राधिकृत अधिकारी यांनी घेतला आहे आणि त्यांची विक्री " जसे आहे जिथे आहे " , " जसे आहे जे आहे " तत्त्वानुसार आणि खालीलप्रमाणे देण्यात आलेल्या तपशिलाच्या अनुसार करण्यात येणार आहे.

अ. क्र.	कर्जदार / सह कर्जदार / हमीदार / कायदेशीर वारसदार यांची नावे व कर्जखाते क्रमांक	संरक्षित मालमत्तेचा तपशील त्यावर असलेल्या भारांसह असल्यास	येणे असलेली रक्कम	राखीव किंमत इसारा रक्कम ठेव	मालमत्तेच्या पाहणीची तारीख, वेळ	लिलावाची तारीख आणि वेळ
ए	बी	सी	डी	इ	एफ	जी
१	सोहन वेनाराम चौधरी (कर्जदार), वेनाराम भनाजी चौधरी (सहकर्जदार) कर्ज खाते क्र. एलएचपीडब्ल्यूके ००००१३१३२६१	३ रा मजला, शोभा रेसिडेन्सी, सावता माळी मंदिराजवळ, पुनावाले सीटीएस क्र. ४७८ ते ४८२, फ्लॅट क्र. ३०२, पुणे – ४११ ०३३, महाराष्ट्र – ४११०३३	रु. ६९,१८,५११/– दि. १५ डिसेंबर, २०२३	रु. ३९,७७,५७०/– रु. ३,९७,७६०/–	०८ जानेवारी, २०२४ रोजी स. ११.०० ते दु. ३.००	१९ जानेवारी, २०२४ रोजी दु. २.०० ते दु. ३.००
२	सुधीर मेनीनाथ वाघमारे (कर्जदार), पुष्पा सुधीर वाघमारे (सहकर्जदार) कर्ज खाते क्र. एलएचपीडब्ल्यूके ००००१२८१६१८	दुकान क्र. १३, तळमजला, कुमार पूर्णकुटी, सर्व्हे क्र २५/४०३, नीता पार्कसमोर, गाव येरवडा, तालुका पुणे, महाराष्ट्र – ४११ ००६.	रु. २२,७३,६७२/– दि. १५ डिसेंबर, २०२३	रु. २३,२३,६८८/– रु. २,३२,३७०/–	०८ जानेवारी, २०२४ रोजी स. ११.०० ते दु. ३.००	१९ जानेवारी, २०२४ रोजी दु. २.०० ते दु. ३.००
३	गणेश कुंडलिक भापकर (कर्जदार), मंदा कुंडलिक भापकर (सहकर्जदार) कर्ज खाते क्र. एनएचबीएमटी ०००००८३०५५८ व एनएचबीएमटी ०००००८३०५५७	फ्लॅट क्र. ५, २ रा मजला, श्री स्वामी ओम रेसिडेन्सी, दौंड, जि. पुणे, सीटीएस क्र. २५६१, प्लॉट क्र. २८, दौंड, महाराष्ट्र	रु. १९,०१,०६२/– दि. १५ डिसेंबर, २०२३	रु. १३,७१,५१२/– रु. १,३७,१६०/–	०८ जानेवारी, २०२४ रोजी स. ११.०० ते दु. ३.००	१९ जानेवारी, २०२४ रोजी दु. २.०० ते दु. ३.००
४	शशांक अनिल दादर (कर्जदार), ऋतुजा शशांक दादर (सहकर्जदार) उषा अनिल दादर (सहकर्जदार) कर्ज खाते क्र. एलएचबीएमटी ००००१३९९८३२	युनिट क्र. १, तळमजला, चैतन्य प्राइड, सर्व्हे क्र. १०५/ए/१/ए/२२/२/१, शालीमार चौक, श्रद्धा हॉस्पिटलच्या समोर, दौंड, तालुका दौंड, जि. पुणे, दौंड – ४१३८०१.	रु. २१,४२,९४९/– दि. १५ डिसेंबर, २०२३	रु. ३०,०१,१६३/– रु. ३,००,१२०/–	०८ जानेवारी, २०२४ रोजी स. ११.०० ते दु. ३.००	१९ जानेवारी, २०२४ रोजी दु. २.०० ते दु. ३.००
५	बालाजी सटवा गाडे (कर्जदार), सुवर्णा बालाजी गाडे (सहकर्जदार) कर्ज खाते क्र. एलएचपीयूएन ००००१२९७३१६	१ ला मजला, सारा सिटी सी ११, गट क्र.१३७,१३८,१३९,१४०,१४१, १४२,१४३,१४४,१४५,१५०,१५२, १एनडी १५७ मु. खराबवाडी, ता. खेड, पुणे, १०४ पुणे –४१० ५०१.	रु. ७,८०,८३८/– दि. १५ डिसेंबर, २०२३	रु. ८,३६,५२८/– रु. ८३,६६०/–	०८ जानेवारी, २०२४ रोजी स. ११.०० ते दु. ३.००	१९ जानेवारी, २०२४ रोजी दु. २.०० ते दु. ३.००
६	ग्रीन फील्ड्स इंडिया प्रायव्हेट लिमिटेड (कर्जदार), केतन सुनील शाह (सहकर्जदार) मानव केतन शाह (सहकर्जदार) कर्ज खाते क्र. एलएचपीयूएन ००००१२७७२१५	१ ला मजला व बेसमेंट, पार्किंग इक्विटो, इक्विटोरियल फॉर्माकट्स, शिवाजी नगर, पुणे. पुणे, महाराष्ट्र – ४११ ००५	रु. ८९,७५,०८९/– दि. १५ डिसेंबर, २०२३	रु. ७४,३०,७०७/– रु. ७,४३,०८०/–	०८ जानेवारी, २०२४ रोजी स. ११.०० ते दु. ३.००	१९ जानेवारी, २०२४ रोजी दु. २.०० ते दु. ३.००
७	अश्विन पांडू गोकुळ (कर्जदार), महालक्ष्मी पांडू गोकूळ (सहकर्जदार) कर्ज खाते क्र. एलएचपीयूएन ००००१२९९४२४	बी २बी विंग, २ रा मजला, श्रीराम अपा., देवकी नगर, दौंड ग्रामीण, गोपाळवाडी गाव, ता. दौंड, सर्व्हे क्र. २ २ बी, जुना सर्व्हे क्र. १६८, दौंड ४१३८०१, दौंड, महाराष्ट्र – ४१३८०१.	रु. १८.३३.४४२/– दि. १५ डिसेंबर, २०२३	रु. १७,०१,४८६/– रु. १,७०,१५०/–	०८ जानेवारी, २०२४ रोजी स. ११.०० ते दु. ३.००	१९ जानेवारी, २०२४ रोजी दु. २.०० ते दु. ३.००
८	ज्योत्स्ना जितेंद्र कांबळे (कर्जदार), जितेंद्र शंकर कांबळे (सहकर्जदार) कर्ज खाते क्र. एलएचपीडब्ल्यूके ००००१२९९५८५	फ्लॅट क्र. ३०२, ३ रा मजला, विंग ए ५, तारा सिटी लोणी काळभोर, ता. हवेली, गट क्र. १६०७, १६०८,१६०९, १६११ व १७०२, पुणे – ४१२२०१, पुणे, महाराष्ट्र – ४१२२०१.	रु. ३२,९६,४०३/– दि. १५ डिसेंबर, २०२३	रु. २०,२०,७८८/– रु. २,०२,०८०/–	०८ जानेवारी, २०२४ रोजी स. ११.०० ते दु. ३.००	१९ जानेवारी, २०२४ रोजी दु. २.०० ते दु. ३.००

ऑनलाइन लिलाव प्रक्रिया ही आमची लिलाव एजन्सी **ग्लोबल टेक** यांचे संकेतस्थळ (**यूआरएल लिंक** – https://BestAuctionDeal.com) यांच्या माध्यमातून घेण्यात येईल. तारणदार /सूचना देण्यात येत आहे की त्यांनी एकूण येणे असलेली रक्कम अधिक त्यावरील व्याज आणि अन्य शुल्क दिनांक **१८ जानेवारी, २०२४** रोजी **संध्याकाळी ०५. ००** पर्यंत अदा करावे. त्यास्तव ही शेवटची संधी आहे, अन्यथा संरक्षित मालमत्तांची विक्री वरीलप्रमाणे नमूद केलेल्या वेळापत्रकानुसार करण्यात येणार आहे.
प्रस्तावित बोलीदार यांनी ईएमडी रक्कम आरटीजीएस / डीडी यांच्या माध्यमातून (रकाना ई चा संदर्भ घ्यावा) **आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड, कार्यालय क्र. १०१, १ ला मजला, फोर्च्यून बिझनेस सेंटर, ॲम्बियन्स हॉटेलजवळ, कस्पटे वस्ती, वाकड, पुणे – ४११ ०५७** येथे **१८ जानेवारी, २०२४** रोजी **संध्याकाळी ४.००** वाजेपर्यंत किंवा त्यापूर्वी अदा करावी. कृपया नोंद घ्यावी की, प्रस्तावित बोलीदार वरीलप्रमाणे नमूद केलेल्या वेळापत्रकानुसार आणि वेळेत आपली बोली सादर करू शकणार नसतील, तर निविदा प्रपत्र **आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड, कार्यालय क्र. १०१, १ ला मजला, फोर्च्यून बिझनेस सेंटर, ॲम्बियन्स हॉटेलजवळ, कस्पटे वस्ती, वाकड, पुणे – ४११ ०५७** येथे **१८ जानेवारी, २०२४** रोजी **संध्याकाळी ५.००** वाजेपर्यंत किंवा त्यापूर्वी सादर करता येईल. ईएमडी रकमेच्या संदर्भात डीडी हा राष्ट्रीयीकृत / शेड्युल बँकेचा आणि " **आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड– लिलाव** " यांच्या नावे आणि **पुणे दौंड** येथे देय असावा.
वरीलप्रमाणे नमूद केलेल्या संरक्षित मालमत्तांच्या संदर्भात पाहणी करण्यासाठी यापुढील अधिक स्पष्टीकरणासाठी, तसेच लिलावाच्या संदर्भात अटी आणि शर्ती यांची माहिती जाणून घेण्यासाठी आणि निविदा सादर करण्याच्या संदर्भातील अधिक माहिती जाणून घेण्यासाठी कृपया **आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड – ९९२०८०७३००** किंवा आमचे विक्री आणि विपणन भागीदार **नेक्सेन सोल्युशन्स प्रायव्हेट लिमिटेड** यांच्याशी संपर्क साधावा.
कोणतीही किंवा सर्व बोली कोणतेही कारण न देता फेटाळून लावण्याचा अधिकार प्राधिकृत अधिकारी यांनी राखून ठेवला आहे. विक्रीच्या संदर्भातील सविस्तर अटी आणि शर्ती जाणून घेण्यासाठी कृपया https://www.icicihfc.com येथे भेट द्यावी.

दिनांक : १ जानेवारी, २०२४
स्थळ : पुणे, दौंड

प्राधिकृत अधिकारी ,
आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड